# महाराष्ट्र विधानसभा निवडणुका २०१९ : सोलापूर जिल्ह्याचा स्थानिक संदर्भ

**प्रा.डॉ. मोहन चौगुले,**
**राज्यशास्त्र विभागप्रमुख ,**
**छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर.**

**प्रस्तावना :**

सहकार, उद्योग आणि शिक्षण संस्था यांचे चांगले जाळे असल्यामुळे पश्चिम महाराष्ट्र नेहमीच सत्ताकारणात निर्णायक भूमिकेमध्ये राहिला आहे. या संस्थावर कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची मक्तेदारी आहे. यामुळेच राज्याच्या सत्तासमतोलामध्ये कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची भूमिका महत्त्वाची होती. परंतु १९९५ नंतरच्या विधानसभा निवडणुकीपासून कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वर्चस्वाला धक्के बसायला सुरुवात झाली. याची प्रमुख कारणे म्हणजे वैयक्तिक स्वार्थाने बरबटलेल्या या पक्षाच्या नेत्यांनी सहकाराची मोडतोड सुरु केली. खाजगीकरणाकडे त्यांचा कल जाऊ लागला. लोकांना तो रुचला नाही. त्यामुळे पारंपरिक मतदार या पक्षांपासून दूर गेले. तसेच पुढे मतदारसंघ पुनर्रचनेमुळे मोठमोठ्या नेत्यांचे मतदारसंघ अडचणीत आले. आणि सध्या २०१९ च्या निवडणुकीपूर्वी पक्षांतराचा फटका या पक्षांना बसला. पाच वर्षे विरोधात काढल्यानंतर सर्वच कॉन्ग्रेसी नेते भयभीत झाले. आपल्या संस्था टिकविण्यासाठी किंवा संस्थेतील घोटाळ्यापासून स्वतःला वाचविण्यासाठी या नेत्यांनी पक्षांतराचा मार्ग पत्करला. २०१९ च्या निवडणुकीत हाच मुद्दा चर्चेचा राहीला. पश्चिम महाराष्ट्र हा कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. पश्चिम महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा जिल्हा म्हणून सोलापूर जिल्ह्याची ओळख आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार सोलापूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ४३.१८ लाख असून त्यापैकी ६७.६०% ग्रामीण आणि ३२.४०% नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्यात अनुसूचित जातीची लोकसंख्या १५.०५% आहे तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या १.८०% आहे. (www.censusindia.co.in/2011) सोलापूर शहर, बार्शी, पंढरपूर ही प्रमुख तीन शहरे आहेत. बार्शीचा व्यापार लातूरकडे सरकला तर सोलापूर शहरातील कापड व्यवसाय बंद पडला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचा मुख्य आधार शेती राहीला आहे. उजनी धरणाच्या पाण्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील जमीन ओलिताखाली आली. त्यामुळे या जिल्ह्यातील माढा, करमाळा, बार्शी, पंढरपूर, सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यांमध्ये जिरायती जमिनीचे रूपांतर बागायती शेतीमध्ये झाले. येथे पाणी व सरकार हे घटक राजकीय संघटन करताना दिसतात. (सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन;२०१४:४७) सोलापूर जिल्हा तीन लोकसभा मतदारसंघामध्ये विभागला गेला असून जिल्ह्यात अकरा विधानसभा मतदारसंघ आहेत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये शेतकरी कामगार पक्षाने जिल्ह्यात विस्तार वाढविला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मात्र जिल्ह्यावर कॉंग्रेसचे अधिराज्य राहीले. आता महाराष्ट्राच्या पुरोगामी राजकारणाची कूस बदलते आहे जिल्ह्यातील राजकारण उजव्या बाजूने झुकविण्यासाठी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अकलूजच्या मोहिते-पाटलांना भाजपात घेतले. तसेच प्रयत्न विधानसभेच्या तोंडावर चालू होते. युतीच्या स्थानिक व राज्यातील नेत्यांना यश मिळत गेले.२०१९च्या लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील दोन्ही लोकसभेच्या जागा भाजपाने जिंकल्या. त्यामागे पक्षीय ताकतीच्या मर्यादा ओळखून सामाजिक, भौगोलिक, राजकीय अवकाश विस्तारण्याचा जसा प्रयोग केला. त्याचा कित्ता पुन्हा गिरवला जात आहे.

**१)करमाळा विधानसभा मतदारसंघ :** करमाळा विधानसभा मतदारसंघांमध्ये १९६२ पासून २००९ पर्यंत अनेक राजकीय घडामोडी झालेल्या आहेत. या मतदारसंघावर सुरुवातीच्या काळापासून जगताप घराण्याचे वर्चस्व आहे. १९६७ पासून १९८० पर्यंत कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. १९६२ व १९८५ ते १९९९पर्यंत अपक्षाचे वर्चस्व होते. करमाळा तालुका बागायती असल्याने जनतेने साखर कारखान्याची संबंधित असणाऱ्या उमेदवाराला स्वीकारले आहे. या मतदारसंघातून सातत्याने मराठा जातीचे उमेदवार निवडून आलेले आहेत. त्यामुळे मराठा जातीअंतर्गत राजकीय स्पर्धा या ठिकाणी दिसून येते. त्यामुळे कॉंग्रेसकडून अपक्षाकडे व

अपक्षाकडून शिवसेनेकडे आणि शिवसेनेकडून राष्ट्रवादीकडे आणि पुन्हा अपक्षाकडे हा मतदारसंघ गेल्याचे दिसून येते. करमाळा मतदारसंघात एकूण ११८ गावे आहेत त्यापैकी ३६ गावे ही माढा तालुक्यातील आहेत.( www.adrindia.org)

२०१४ च्या निवडणुकीत संजय शिंदे हे सुमारे २००० मताने पराभूत झाले होते. त्यानंतरच्या काळात त्यांनी या मतदारसंघाच्या सतत संपर्कात राहून कार्यकर्त्याची फौज तयार केली, शिस्तबद्ध प्रचार केला नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये त्यांचा पराभव झाला त्याची सहानुभूतीही त्यांना मिळालेली दिसून येते. २०१९ च्या निवडणुकीमध्ये अपक्ष उमेदवार संजय शिंदे हे ५४९२ मताने विजयी झाले. संजय शिंदे हे सोलापूर जिल्हा परिषदेचे विद्यमान अध्यक्ष आहेत. मागील पाच वर्षामध्ये त्यांनी करमाळा मतदारसंघामध्ये अनेक विकासाची कामे केली आहेत. माढा तालुक्यातील ३६ गावातून शिंदे यांना मताधिक्य मिळाले त्याचा फायदा त्यांना झालेला दिसून येतो. शिवाय ऐन निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेने विद्यमान आमदार नारायण आबा पाटील यांची उमेदवारी कापून नुकतेच राष्ट्रवादीतून शिवसेनेत प्रवेश केलेल्या रश्मी बगल यांना शिवसेनेची उमेदवारी देण्यात आली. नारायण पाटीलांनी मागील पाच वर्षामध्ये विकासाची कामे केली होती, तसेच शिवसेनेने त्याचे तिकीट नाकारल्याची सहानुभूतीही त्यांना मिळाली. पाटील अपक्ष उभे राहूनही त्यांना ६३००० पेक्षा जास्ती मते मिळाली. तर शिवसेनेच्या अधिकृत उमेदवार रश्मी बागल यांना ४४००० मते मिळाली.(दैनिक दिव्यमराठी,२५ ऑक्टोबर२०१९) बागल यांनी ऐनवेळी राष्ट्रवादी पक्ष सोडल्याचे लोकांना आवडले नाही तसेच बागल यांच्या साखर कारखान्याच्या संदर्भात लोकांच्या तक्रारी होत्या. मतदारांनी मतदानातून ते व्यक्त केलेले दिसून येते. या मतदारसंघामध्ये खरी लढत ही दोन अपक्षामध्ये झाली. आणि शिवसेनेचा उमेदवार तिसऱ्या स्थानावर राहीला.

**२)माढा विधानसभा मतदारसंघ :** सोलापूर जिल्ह्यातील एक बागायती तालुका म्हणून ओळखला जातो. कारण उजनी धरणाचा या तालुक्याला मोठ्या प्रमाणात फायदा झालेला आहे. तसेच आशिया खंडातील सर्वात मोठा सीना-भीमा नदी जोड प्रकल्प या तालुक्यात आहे. सिंचन क्षेत्र वाढल्याने सोलापूर जिल्ह्यातील माढा विधानसभा मतदारसंघात साखर कारखानदारीला भरभराट आली. १९६२ पासून आजपर्यंत मराठा समाजाचे उमेदवार या मतदारसंघातून निवडून गेलेले दिसतात. म्हणजे या मतदारसंघात मराठा समाजाचे वर्चस्व आहे. कारण मराठा समाजाच्या अंतर्गत येथे राजकीय स्पर्धा दिसून येते.

२०१९ च्या निवडणुकीमध्ये विद्यमान आमदार बबनदादा शिंदे हे सलग सहाव्यांदा निवडून आले. निवडणुकीपूर्वी बबनदादा शिंदे राष्ट्रवादी पक्ष सोडून भाजपात जाणार अशी चर्चा होती, शरद पवार यांच्या सोलापूर दौऱ्याच्या वेळी त्यांनी शिंदे यांना भेटण्याचे टाळले होते. मात्र शेवटी शिंदे यांनी राष्ट्रवादीची उमेदवारी मिळवली. या निवडणुकीत शिंदे यांचे सर्व विरोधक एकत्र येऊन एकास एक याप्रमाणे शिवसेनेने संजय कोकाटे यांना उमेदवारी दिली. या मतदार संघातील पंढरपूर तालुक्यातील ४२ गावे आणि माळशिरस तालुक्यातील १४ गावामध्ये लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाच्या उमेदवाराला १६००० मतांची आघाडी मिळाली होती. या निवड णूकीत मात्र हे मताधिक्य राहीले नाही उलट राष्ट्रवादीच्या शिंदेना २००० मतांची आघाडी मिळाल्याचे दिसून येते. याचे कारण म्हणजे विद्यमान आमदार शिंदे यांनी या भागात रस्ते, वीज,पाणी, लोकांच्या समस्या सोडविणे यासारखी केलेली विकासकामे, सामान्य लोकांशी थेट संपर्क , जास्तीचा ऊसाचा दर ही कारणे महत्त्वाची आहेत. शिवाय पंढरपूर तालुक्यातील परिचारक व काळे गटाने ऐनवेळी तटस्थ भूमिका घेतल्याने त्याचा फटका कोकाटेना बसलेला दिसून येतो. (दैनिक सकाळ,२५ ऑक्टोबर२०१९)

**३)बार्शी विधानसभा मतदारसंघ :** बार्शी तालुका हा कमी पावसाचा तालुका म्हणून ओळखला जातो. तसेच विकासापासून वंचित असलेला हा तालुका आहे. फार पूर्वी व्यापाराच्या दृष्टीने या शहराला ऐतिहासिक महत्त्व आहे. या शहराचा बराचसा व्यापार लातूर शहराकडे वळला आहे. बार्शी हा विधानसभा मतदारसंघ महाराष्ट्रातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून अस्तित्वात आहे. या मतदारसंघांमध्ये १९६२ ते १९९० पर्यंत काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून गेलेले दिसतात. त्याप्रमाणे १९६२, १९६७, १९७२ यासारख्या सलग तीन पंचवार्षिक निवडणुकांमध्ये महिला उमेदवार निवडून गेलेले दिसतात.(www.adrindia.org)

या निवडणुकीमध्ये बार्शीची जागा शिवसेनेला दिल्याचे जाहीर होताच भाजपा मध्ये असलेले राजेंद्र राऊत यांनी आपली अपक्ष उमेदवारी जाहीर केली. त्यांच्या विरोधात राऊत यांचे पारंपारिक विरोधक व विद्यमान आमदार दिलीप सोपल यांनी राष्ट्रवादी सोडून शिवसेनेत प्रवेश केला आणि बार्शी मतदारसंघाची उमेदवारी मिळवली. या निवडणुकीत अपक्ष उमेदवार राजेंद्र राऊत यांनी ३०७६ मताधिक्य मिळवत सोपल यांच्यावर विजय मिळविला. राष्ट्रवादीचे उमेदवार निरंजन भूमकर (वैराग) यांना १५००० मते तर अपक्ष विशाल कळसकर यांना ११००० मते मिळाली.(www.adrindia.org)राऊत यांना ट्रॅक्टर तर कळसकर यांना रोडरोलर हे निवडणूक चिन्ह मिळाले होते. त्यांचा अनुक्रमांकही ४ आणि ५ असा होता त्यामुळे या दोन चिन्हाच्या बाबतीत मतदार गोंधळात पडले आणि राऊत यांची बरीच मते कळसकर यांना मिळाल्याचे म्हटले जाते. मागील पाच वर्षामध्ये भरीव कामे, जनसंपर्क, प्रभावी प्रचार यंत्रणा , कार्यकर्ता संघ यामुळे राऊत हे विजयी होऊ शकले. शिवाय वैराग येथील बाळासाहेब कोरके यांच्या जगदंबा परिवार राऊत यांच्या पाठीशी होता. यापूर्वी २००४ च्या निवडणुकीत जगदंबा परिवाराच्या पाठींब्यावरच राऊत विजयी झाले होते. तर २००९ आणि २०१४ च्या निवडणुकीत जगदंबा परिवार राऊतांच्या विरोधात होता त्यावेळी राऊत यांचा पराभव झाला. थोडक्यात बार्शीच्या विधानसभा निवडणुकीत जगदंबा परिवाराची भूमिका महत्त्वाची दिसून येते. (दैनिक लोकमत,२५ ऑक्टोबर२०१९)

**४)मोहोळ विधानसभा मतदारसंघ :** सोलापूर जिल्ह्यातील सर्वात जास्त जिरायती भागात असलेला तालुका म्हणून मोहोळ तालुका ओळखला जातो. मोहोळ मतदारसंघ पुनर्रचनेनंतर अनुसूचित जातीसाठी राखीव झाला असला तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे येथे वर्चस्व दिसून येते. या मतदारसंघातून निवडून आलेल्या प्रतिनिधीला येथील स्थानिक नेत्याला विश्वासात घेऊनच विकास कामे करावी लागतात. कारण या मतदार संघातील सर्वच स्थरावर स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांचे वर्चस्व आहे. २००९ साली लक्ष्मण ढोबळे आणि २०१४ साली मोदी लाट असतानाही या मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा उमेदवार रमेश कदम हे निवडून आले. या मतदारसंघात मराठा समाजाची अंतर्गत राजकीय स्पर्धा आहे. परंतु हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाल्यामुळे येथून अनुसूचित जातीचा प्रतिनिधी निवडून देणे मतदारांना बंधनकारक झाले आहे.

या मतदार संघामध्ये प्रत्येक वेळी नवा उमेदवार दिला जातो. राष्ट्रवादी पक्षाकडून यशवंत माने यांना उमेदवारी देण्यात आली. विद्यमान आमदार रमेश कदम यांनी तुरुंगातून अपक्ष निवडणूक लढविली. रमेश कदम यांनी रस्ता, पाणी या सारखी लोकाभिमुख कामे केली आहेत शिवाय तुरुंगातून ते विकासनिधी वाटपाच्या बाबतीत अग्रेसर राहिले त्या जोरावरच त्यांनी निवडणूक लढविली. त्यांना तिसऱ्या क्रमांकाची २३६४९ मते मिळाली. सुरुवातीला कदम यांचा राष्ट्रवादीच्या उमेदवाराला फटका बसेल असे वाटत होते. राष्ट्रवादीचे माजी जिल्हाअध्यक्ष मनोहर डोंगरे हे भाजपात गेल्यामुळे राष्ट्रवादी पक्ष अडचणीत येईल असे वाटत होते.तालुक्यातील सर्व नेते एका बाजूला होते तर राजन पाटील हे राष्ट्रवादीच्या बाजूने होते. शेवटी परंपरेप्रमाणे राष्ट्रवादीचा उमेदवार निवडून आला. यशवंत माने हे २१६९९ मतांनी विजयी झाले. (दैनिक लोकमत, २५ऑक्टोबर२०१९)

**५) सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ :** हा मतदारसंघ संपूर्ण शहरी मतदारसंघ आहे. १९६२पासून हा मतदारसंघ अस्तित्वात आला. शहरी भागाचा या मतदारसंघांमध्ये समावेश होत असल्यामुळे हा मतदारसंघ महापालिकेतील नगरसेवकांच्या राजकारणावर व राजकीय पक्षांवर अवलंबून आहे १९९० नंतर या मतदारसंघांमध्ये भाजपचे वर्चस्व वाढलेले दिसून येते. या मतदारसंघांमध्ये स्थानिक प्रश्नाला जास्त महत्त्व दिले जाते. या मतदारसंघावर लिंगायत समाजाचे वर्चस्व असलेले दिसून येते. लिंगायत समाजाच्या बरोबरच पद्मशाली या तेलगू समाजाचे वर्चस्व आहे. तसेच हा मतदारसंघ पुनर्रचनेपूर्वी व पुनर्रचनेनंतर भाजपच्या वर्चस्वाखाली राहीला आहे.या मतदारसंघात लिंगायत, मराठा, पद्मशाली या समाजामध्ये राजकीय स्पर्धा आहे. मात्र या मतदारसंघावर ती लिंगायत समाजाचे वर्चस्व राहीलेले दिसून येते. (दैनिक लोकमत, २५ऑक्टोबर२०१९)

या मतदार संघातून विद्यमान आमदार व पालकमंत्री विजयकुमार देशमुख हे भाजपा कडून निवडणूक लढवत होते. सोलापूर जिल्ह्यातून सर्वाधिक मताधिक्य घेऊन ७३,०६८ ते चौथ्यांदा विजयी झाले.वंचित

आघाडीचा उमेदवार विद्यमान नगरसेवक आनंद चंदनशिवे हे दुसऱ्या क्रमांकावर तर राष्ट्रवादीचा उमेदवार माजी नगरसेवक मनोहर सपाटे हे तिसऱ्या क्रमांकावर होते. हा मतदारसंघ लिंगायत बहुल असून हा समाज देशमुख यांच्या पाठीशी राहीला. शिवाय भाजपचा मतदारही या मतदारसंघात मोठ्या संख्येने आहे. या मतदारसंघातील कॉंग्रेसचे स्थानिक नेते शहर मध्यमध्ये प्रणिती शिंदे यांच्या मतदारसंघामध्ये गुंतले होते. त्यामुळे सपाटे यांच्या प्रचाराकडे ते फिरकले नाहीत. तसेच शहर राष्ट्रवादीतील अंतर्गत गटबाजीमुळे राष्ट्रवादीचे स्थानिक नेते सपाटे यांच्या प्रचारात सहभागी झाले नाहीत. त्यामुळे ही निवडणूक तशी एकतर्फी झालेली दिसून येते. (दैनिक दिव्यमराठी, २५ऑक्टोबर२०१९)

**६) सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ :** हा मतदारसंघ पूर्णपणे शहरी मतदारसंघ आहे. या मतदारसंघांमध्ये बहुसंख्य मतदार हे झोपडपट्टी व कामगार वर्गातील आहेत. तसेच या मतदारसंघांमध्ये पद्मशाली, तेलुगु ,लिंगायत, मुस्लिम आणि साळी इत्यादी समाजाची संख्या जास्त आहे. या मतदारसंघांमध्ये पद्मशाली, लिंगायत, मुस्लिम, अनुसूचित जाती यामध्ये राजकीय स्पर्धा आहे. तसेच या मतदारसंघात पद्मशाली समाजाचे वर्चस्व कमी होऊन अनुसूचित जातीचे वर्चस्व निर्माण झाल्याचे दिसते.

सोलापूर जिल्ह्यातील सर्वात जास्त चुरशीची निवडणूक म्हणून या मतदारसंघाकडे सर्वांचे लक्ष होते. या मतदारसंघातून कॉंग्रेसच्या प्रणिती शिंदे ह्या ११९४३ मतांनी विजयी झाल्या. तिसऱ्यांदा त्यांची आमदारपदी निवड झाली. त्या सोलापूर जिल्ह्यातील एकमेव महिला आमदार आहेत. मागील दहा वर्षात मतदारसंघामध्ये असलेला नियमित संपर्क , विकासकामे, विविध जातीच्या पुढारी व कार्यकर्त्याशी संवाद , प्रभावी प्रचार यंत्रणा , सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योजक यांना सोबत घेऊन निवडणुकीत कामे, डोकेबाज रणनीतीच्या जोरावर प्रचार, युवक,अभिजन, नवमतदार शिंदेच्या बाजूने त्यामुळे शिंदे यांचा विजय होऊ शकला. या मतदार संघातील माजी महापौर महेश कोठे आणि माजी आमदार नरसय्या आडम हे दोघे पद्मशाली समाजाचे उमेदवार यांनी 'जय मार्कंडेय'चा नारा दिला. निवडणुकीपूर्वी कॉंग्रेस मधून शिवसेनेत आलेले माजी आमदार दिलीप माने यांना शिवसेनेने उमेदवारी दिली. मात्र माने यांना पक्ष आणि मतदारसंघ नवखा असल्यामुळे प्रभावी प्रचार यंत्रणा असूनही ते चौथ्या क्रमांकावर राहिले.शिवसेना बंडखोर उमेदवार कोठे हे तिसऱ्या क्रमांकावर आणि एमआयएम चे उमेदवार फारुख शाब्दी हे दुसऱ्या क्रमांकावर राहीले. माने यांना २७३४० आणि कोठे यांना २९५२६ अशी ५६८६६ मते मिळाली. तर शिंदे यांना ४८८५२ मते मिळाली. .(www.adrindia.org) जर या ठिकाणी शिवसेनेची बंडखोरी झाली नसती तर सेनेचा उमेदवार निवडून आला असता. मात्र बंडखोरीमुळे मतविभाजन झाले त्याचा फायदा शिंदेना झाला. एमआयएम चे उमेदवार शाब्दी यांना मुस्लीम बहुल भागात आघाडी मिळाली. तर पद्मशाली सामाजामध्ये एकीचा अभाव असल्यामुळे या समाजाची ६५००० मते असतानाही कोठेना फक्त २९९९५ इतकी मते मिळाली.

**७) अक्कलकोट विधानसभा मतदारसंघ :** अक्कलकोट हा महाराष्ट्र-कर्नाटक राज्याच्या सीमेवर असलेला हा तालुका आहे. १९६२ ते १९७२ या काळात मराठा समाजाचे उमेदवार निवडून आले आहेत. तसेच १९७८ साली मुस्लिम समाजाचा तर १९८० ते २००४ पर्यंत निवडून गेलेले प्रतिनिधी हे लिंगायत समाजाचे आहेत. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघावर लिंगायत समाजाचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. पुढे हा मतदारसंघ कॉंग्रेसकडून भाजपकडे तर भाजपकडून कॉंग्रेसकडे सरकल्याचे दिसते. या मतदारसंघात लिंगायत, मराठा व मुस्लीम अशी राजकीय स्पर्धा राहीली आहे. या मतदारसंघांमध्ये ७५%पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण आहे. त्यामुळे हा मतदारसंघ ग्रामीण बहुल स्वरूपाचा समजला जातो.

भाजपाचे सचिन कल्याणशेट्टी हे ३६७८९ मतांनी विजयी झाले. कॉंग्रेसचे विद्यमान आमदार सिद्धराम म्हेत्रे यांचा पराभव झाला. अक्कलकोटमधील भाजपचे दोन गट आहेत. यापैकी कल्याणशेट्टी विरोधी गटाने पालकमंत्री देशमुख यांच्या मार्फत म्हेत्रे यांना भाजपमध्ये घेऊन त्यांना उमेदवारी देण्याचा प्रयत्न केला. मात्र कल्याणशेट्टी गटाने सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्या मार्फत थेट मुख्यमंत्र्यांकडून कल्याणशेट्टी यांना उमेदवारी मिळवून दिली. त्यामुळे म्हेत्रे यांचा भाजप प्रवेश रद्द झाला आणि त्यांनी ऐनवेळी कॉंग्रेस मधून निवडणुक लढविली. या पूर्वी म्हेत्रे तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. म्हेत्रेंचा भाजप प्रवेश लोकांना मानवलेला दिसत नाही. म्हणून म्हेत्रे यांचे गाव दुधनी परिसर सोडून इतर ठिकाणी ते पिछाडीवर राहीलेले दिसून येतात. (www.adrindia.org)

**८)सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघ** : या मतदारसंघावर पूर्वीपासूनच काँग्रेस पक्षाचे वर्चस्व आहे. १९८० चा अपवाद वगळता दहा वेळा या मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार निवडून गेले आहेत. या मतदारसंघांमध्ये चार वेळा लिंगायत समाजाचे प्रतिनिधी निवडून गेले. धनगर समाजाचा एकच उमेदवार पाच वेळा निवडून गेला. दोन वेळा अनुसूचित जातीला नेतृत्व करण्याची संधी मिळाली. या मतदारसंघांमध्ये धनगर व लिंगायत समाजाची लोकसंख्या प्रभावी ठरते. आजपर्यंत काँग्रेस अंतर्गतच लिंगायत व धनगर समाज यांच्यामध्ये राजकीय स्पर्धा आहे. तसेच हा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जातो. या मतदारसंघात धनगर, मराठा, मुस्लिम, अनुसूचित जाती यांच्यामध्ये राजकीय स्पर्धा आहे. पुनर्रचनेनंतर या मतदारसंघातून प्रथमच मराठा समाजाचा उमेदवार निवडून आला. २००९,२०१४,२०१९ या निवडणुकीत या मतदारसंघावर मराठा समाजाने नव्याने वर्चस्व निर्माण केले आहे. (दैनिक लोकमत , ९ऑक्टोबर२०१९)

या मतदार संघातून विद्यमान आमदार व सहकार मंत्री सुभाष देशमुख हे ३०००० मतांनी निवडून आले. निवडणुकीपूर्वी त्यांना सुमारे दीड लाखांचे मताधिक्य मिळेल असा अंदाज होता. कारण मागील पाच वर्षामध्ये मतदारसंघाशी सततचा जनसंपर्क , विकासकामे, विकासनिधी खर्च करूनही त्यांना ५६ गावातून अपेक्षित मताधिक्य मिळाले नाही. म्हणून २०२४ ची निवडणूक भाजपासाठी विचार करायला लावणारी आहे. कारण काँग्रेसचे नगरसेवक बाबा मिस्त्री यांनी काँग्रेस व मुस्लिम मते घेत देशमुख यांच्याशी कडवी झुंज दिली. देशमुख यांचे पारंपरिक विरोधक सेना भाजपात आले. त्यामुळे विरोधकच शिल्लक नाहीत असा समज होता. तालुक्यातील जनाधार नसलेले नेते देशमुख यांच्या पाठीशी होते. लिंगायत समाजाने भाजपला पाठींबा दिला. त्यामुळे धनगर समाज भाजपवर नाराज होता. भाजपामधील अंतर्गत विरोध यामुळे देशमुखांचे मताधिक्य घटलेले दिसून येते. ग्रामीण आणि मुस्लिम भागातून मिस्त्रीना मताधिक्य मिळाले. (दैनिक लोकसत्ता , २५ऑक्टोबर२०१९) या मतदारसंघामध्ये देशमुख यांचे साखर कारखाने आहेत.या साखर कारखान्याच्या बाबतीत स्थानिक लोकांच्या व शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी होत्या. मतदारांनी आपली नाराजी मतदानातून व्यक्त केली. या मतदारसंघातील ५६ गावातून देशमुखांचे मताधिक्य घटले केवळ सोलापूर शहरातील भाजपाच्या हक्काच्या मतदानामुळे ३०००० मतांनी देशमुख निवडून आले.

**९)पंढरपूर विधानसभा मतदारसंघ :** सोलापूर जिल्ह्यातील राजकारणाचा केंद्रबिंदू म्हणून पंढरपूर तालुक्याकडे पाहीले जाते. ऊस आणि सहकार या क्षेत्रातील बरेच राजकारण पंढरपूर तालुक्यात चालते. या मतदारसंघात सहकार क्षेत्र हा राजकारणाचा सर्वात महत्वपूर्ण भाग आहे. पंढरपूर तालुक्याचे राजकारणाचा केंद्रबिंदू ‘सहकार’ मानला जातो. ज्याचे सहकार क्षेत्रावर वर्चस्व त्याच्या हाती तालुक्यातील सत्ता असे समीकरण निर्माण झालेले पाहायला मिळते. पंढरपूर विधानसभा या मतदारसंघांमध्ये मराठा, ब्राह्मण, अनुसूचित जाती व धनगर समाज अंतर्गत राजकीय स्पर्धा आहे. पुनर्रचनेनंतर या मतदारसंघातील ब्राह्मण समाजाचे वर्चस्व कमी होऊन मराठा समाजाचे वर्चस्व निर्माण झालेले दिसून येते.

या मतदारसंघातून विद्यमान आमदार भारत भालके हे १३३६१ मताधिक्य घेऊन निवडून आले. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी पक्षातून निवडणूक लढविली. भालके हे तिसऱ्यांदा आमदारपदी निवडून आले आहेत. मात्र प्रत्येकवेळी ते वेगळयाच पक्षातून निवडणूक लढवितात. २००९ साली स्वाभिमानी पक्षातून त्यांनी विजयसिंह मोहिते-पाटील यांचा पराभव केला, २०१४ साली काँग्रेस आणि २०१९ मध्ये राष्ट्रवादी पक्षातून निवडणूक लढविली. या निवडणुकीपूर्वी ते सेना किंवा भाजपात प्रवेश करणार अशी चर्चा होती. भालके यांचा होम टू होम संपर्क , प्रत्येक गावात कार्यकर्त्यांची फळी,रस्ते, पाणी,शेतीचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य,जनमानसातील चांगली प्रतिमा यामुळे त्यांचा विजय झाला.या उलट सुधाकरपंत परिचारक यांचे वय वर्षे ८५ झाले आहे. मागील दहा वर्षामध्ये त्यांचा जनसंपर्क राहिला नाही त्यामुळे त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. शिवाय एकाच घरात दोन आमदार नको असाही लोकांचा सूर होता.शरद पवारांना व राष्ट्रवादी पक्षाला मानणारा मतदार मोठ्या संख्येने असल्यामुळे भालके हे स्वतःला ‘शरद पवारांचा पठ्ठा’ असे भाषणातून म्हणत होते. सुशीलकुमार शिंदे, अजित पवार, अमोल कोल्हे, धनंजय मुंडे यांच्या सभा या मतदारसंघामध्ये झाल्या. त्याचाही मतदानावर परिणाम झालेला दिसून येतो. (दैनिक सकाळ, २५ऑक्टोबर२०१९)

**१०)सांगोला विधानसभा मतदारसंघ :** सांगोला तालुका अवर्षणप्रवण म्हणजे दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जातो. या ठिकाणी पावसाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे या ठिकाणी रोजगार हमी योजना सारख्या योजनांवर भर दिला जातो. हा मतदारसंघ शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या मतदारसंघावर गणपतराव देशमुख यांचे निर्विवाद वर्चस्व आहे. गणपतराव देशमुख यांना त्याच्या धनगर समाजाचा पाठींबा, मतदारसंघातील त्यांचे काम आणि त्याचप्रमाणे नेहमीच मराठा समाजाचा मिळत राहीलेला पाठिंबा यामुळे सातत्याने त्यांची निवड होत राहीली आहे.

शिवसेनेचे शहाजी पाटील हे या मतदारसंघातून केवळ ७६८ मतांनी निवडून आले. राष्ट्रवादी बंडखोर ९१५, भाजपा बंडखोर ४४८६ आणि नोटा ७०० अशी मतविभागणी आहे. या पूर्वी १९९५ साली ते निवडून आले होते. गणपतराव देशमुख हे १९६२ पासून (१९७२ आणि १९९५ चा अपवाद वगळता) सलग ११ वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. ९३ व्या वर्षी त्यांनी स्वतः होऊन आपली निवृत्ती जाहीर केली. देशमुख यांनी आपला उत्तराधिकारी म्हणून भाऊसाहेब रुपनर यांचे नाव जाहीर केले होते. मात्र या निवडणुकीपूर्वी त्यामध्ये अचानक बदल करून डॉ. अनिकेत देशमुख ( देशमुखांचे नातू) यांचे नाव पुढे आणले. त्यामुळे रुपनर नाराज झाले त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. राष्ट्रवादीने सांगोला मतदारसंघ शेकाप ला सोडत असल्याचे जाहीर केले आणि राष्ट्रवादीचे दीपक साळुंखे हे नाराज झाले. त्यांनी सेना उमेदवार पाटलांना आपला जाहीर पाठींबा देऊन लढत लक्षवेधी केली. मात्र घराणेशाहीला विरोध करत सर्व विरोधक एकत्र आले त्यांना रुपनर आणि साळुंखे यांची निर्णायक मदत मिळाली. शेकापच्या पराभवामुळे आणि गणपतराव देशमुख यांच्या वाढत्या वयामुळे येणाऱ्या काळात तालुक्याच्या राजकारणाची अनेक समीकरणे बदलणार आहेत. (दैनिक दिव्यमराठी, २५ऑक्टोबर२०१९)

**११)माळशिरस विधानसभा मतदारसंघ :** माळशिरस तालुका सोलापूर जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या सधन व राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण तालुका म्हणून ओळखला जातो कारण सहकारी तत्त्वावरील चार सहकारी साखर कारखाने दूध संघ, सूतगिरणी, वीर व उजनी धरणातून मोठ्या प्रमाणात होणारा पाणीपुरवठा ह्या या तालुक्याच्या जमेच्या बाजू आहेत. या तालुक्याच्या व सोलापूर जिल्ह्याच्या सहकार आर्थिक व राजकीय क्षेत्रावर बरीच वर्षे मोहिते-पाटलांचे मोठ्या प्रमाणावर वर्चस्व राहिले. त्यामुळे या तालुक्यात राजकीय पक्षाला फारसे स्थान पाहण्यास मिळत नव्हते. हा मतदारसंघ पूर्वीपासूनच राष्ट्रवादी काँग्रेस वर्चस्वाखाली होता. पुनर्रचनेनंतर मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाला. त्यामुळे या मतदारसंघातील प्रतिनिधी बदलला. पण हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्चस्वाखालीच राहीला. या मतदारसंघांमध्ये मराठा, ओबीसी (धनगर आणि माळी) व अनुसूचित जाती यांच्यामध्ये राजकीय संबंध आहे. पुनर्रचनेनंतर हा मतदारसंघ राखीव झाल्यामुळे मराठा समाजाच्या नेतृत्वावर मर्यादा आलेल्या आहेत.

या मतदार संघामध्ये मोहिते-पाटील यांचे एक हाती नेतृत्व आहे. सर्व सामान्य दलित, उसतोड कामगाराचा मुलगा, मोहिते–पाटलांचा प्रयत्न आणि पक्षनिष्ठा यामुळे सातपुते यांना भाजपची उमेदवारी मिळाली. नवीन तरुण चेहरा याला मतदारांनी पसंती देत राम सातपुते यांना २५९० मतांनी निवडून दिले आहे. एकूण नोटा मते १८९२ इतकी होती. (www.adrindia.org) भाजपचे नेते उत्तम जानकर यांना भाजपने उमेदवारी नाकारली, त्यांना राष्ट्रवादीने उमेदवारी दिली. त्यामुळे ही निवडणूक चुरशीची झाली. राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच भाजपचा उमेदवार निवडून आला आहे. चार महिन्यापूर्वी लोकसभा निवडणुकीमध्ये मोहिते-पाटील आणि जानकर या जोडीने रणजितसिंह निंबाळकर यांना एक लाखाचे मताधिक्य देऊन निवडून आणले होते. त्यामुळे या निवडणुकीमध्ये भाजपचा एकतर्फी विजय होईल असे वाटत होते. मात्र भाजपने जानकराना उमेदवारी नाकारून चूक केली. राष्ट्रवादीने त्यांना उमेदवारी देऊन निवडणुकीत चुरस निर्माण केली. त्यामुळे या निकालामुळे भाजपा बॅकफूटवार गेला आहे. भाजपा उमेदवाराचा निसटता विजया भाजपा आणि मोहिते-पाटील यांना आत्मचिंतन करण्याची वेळ आहे. या मतदार संघात राष्ट्रवादीला चांगला जनाधार मिळाला आहे. पुन्हा एकदा उभारी घेण्याचे हे संकेत आहेत असे वाटते.

**सोलापूर जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले प्रतिनिधी**

| अ.क्र. | मतदारसंघ | २०१४ ची निवडणूक | | २०१९ ची निवडणूक | |
|---|---|---|---|---|---|
| | | पक्ष | प्रतिनिधी | पक्ष | प्रतिनिधी |
| 1. | करमाळा | शिवसेना | नारायण पाटील | अपक्ष | संजय शिंदे |
| 2. | माढा | राष्ट्रवादी | बबनराव शिंदे | राष्ट्रवादी | बबनराव शिंदे |
| 3. | बार्शी | राष्ट्रवादी | दिलीप सोपल | अपक्ष | राजाभाऊ राऊत |
| 4. | मोहोळ (अ.जा.) | राष्ट्रवादी | रमेश कदम | राष्ट्रवादी | यशवंत माने |
| 5. | सोलापूर शहर उत्तर | भाजपा | विजयकुमार देशमुख | भाजपा | विजयकुमार देशमुख |
| 6. | सोलापूर शहर मध्य | कॉंग्रेस | प्रणिती शिंदे | कॉंग्रेस | प्रणिती शिंदे |
| 7. | अक्कलकोट | कॉंग्रेस | सिद्धाराम म्हेत्रे | भाजपा | सचिन कल्याणशेट्टी |
| 8. | दक्षिण सोलापूर | भाजपा | सुभाष देशमुख | भाजपा | सुभाष देशमुख |
| 9. | पंढरपूर | कॉंग्रेस | भारत भालके | राष्ट्रवादी | भारत भालके |
| 10. | सांगोला | शेकाप | गणपतराव देशमुख | शिवसेना | शहाजी पाटील |
| 11. | माळशिरस (अ.जा.) | राष्ट्रवादी | हनमंत डोळस | भाजपा | राम सातपुते |

**संदर्भ:** (www.adrindia.org)

**२०१९ च्या विधानसभा निवडणुकीचे विश्लेषण** : सोलापूर जिल्ह्यात ११ पैकी चार जागा भाजपने पटकावल्या तर शिवसेनेने आपली १ जागा कशीबशी कायम राखली. राष्ट्रवादीने तीन जागा मिळाल्या तर कॉंग्रेसला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले.दोन जागा अपक्षांना मिळाल्या. सांगोल्यामध्ये शेकापचे ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख यांना त्यांचा राजकीय वारसदार पराभूत झाल्याने धक्का बसला. माढा मतदारसंघामध्ये बबनराव शिंदे व करमाळ्यामध्ये संजय शिंदे हे दोघे बंधू एकाच वेळी निवडून आल्याने हे यंदाच्या विधानसभा निवडणुकांचे वैशिष्ट्य ठरले. चार आमदार हे पहिल्यादाच निवडून आले आहेत तर जिल्ह्यातील एकमेव महिला प्रतिनिधी प्रणिती शिंदे ह्या खुल्या मतदारसंघातून निवडून आल्या आहेत. या निवडणुकीत पाच विद्यमान आमदार पुन्हा निवडून आले आणि चार विद्यमान आमदारांना पराभवाला सामोरे जावे लागले.जिल्ह्याबाहेरील दोन प्रतिनिधी निवडून आले. दोन युवा प्रतिनिधी निवडण्यात आले.माळशिरस,बार्शी, पंढरपूर करमाळा हे राष्ट्रवादीचे बालेकिल्ले म्हणून ओळखले जातात.या ठिकाणच्या दिग्गजांनी राष्ट्रवादी सोडून भाजपा,सेनेत प्रवेश केला. शरद पवारांनी आपल्या भाषणात म्हटल्याप्रमाणे त्यांना टार्गेट करून दिलीप सोपल, परिचारक आणि बागल यांना पराभूत केले. तर माळशिरस मधून मते घटवत सातपुते यांचा निसटता विजय मोहिते पाटलाना धक्का देणारा ठरला. सोलापूर शहर उत्तर वगळता इतर मतदार संघातून जातीविरहित मतदान झाले. तेथील मतदारांनी उमेदवारांचा जनसंपर्क, विकासकामे विचारात घेऊन मतदान केले. सांगोला मतदार संघामध्ये मात्र तेथील मतदारांनी विकासकामांपेक्षा घराणेशाहीला विरोध करत शेकाप चा पराभव केलेला दिसून येतो. मोहोळ मतदारसंघामध्ये माजी आमदार राजन पाटील यांच्या प्रभावामुळे जिल्ह्याबाहेरील राष्ट्रवादीचा नवखा उमदेवार विजयी झाला.

**साखर कारखाने आणि राजकारण :** महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक साखर कारखाने हे सोलापूर जिल्ह्यात आहेत. सोलापूर जिल्ह्यातील राजकारण आणि अर्थकारण हे साखर कारखानदारी भोवती फिरत असलेले दिसून येते. सोलापुरात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ११ मतदारसंघातून ११ साखर कारखानदार या निवडणुकीत उभे होते. पंढरपूर मतदारसंघातून सर्वाधिक म्हणजे ३ साखर कारखानदारांनी निवडणूक लढविली. निवडणूक लढवीत असताना सहकारी असो व खाजगी साखर कारखाना याचा आधार महत्त्वाचा ठरत असतो. या सहकार चळवळीतील अनेक कारखानदार नेत्यांनी आपली कारखानदारी वाचविण्यासाठी लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेस-राष्ट्रवादी पक्षातून भाजपा आणि शिवसेनेत प्रवेश केला. त्यापैकी भालके, बबन शिंदे आणि म्हेत्रे यांना भाजपात प्रवेश मिळाला नाही भालकेनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. बबन शिंदे आणि म्हेत्रे यांनी पुन्हा आपल्याच पक्षातून निवडणूक लढविली.

**सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदार उमेदवार**

| अ.क्र. | नाव | पक्षांतर | २०१९ चा निकाल |
|---|---|---|---|
| 1. | दिलीप सोपल | होय | पराभूत |
| 2. | बबन शिंदे | नाही | विजयी |
| 3. | संजय शिंदे | होय | विजयी |
| 4. | रश्मी बागल | होय | पराभूत |
| 5. | सिद्धाराम म्हेत्रे | नाही | पराभूत |
| 6. | दिलीप माने | होय | पराभूत |
| 7. | सुधाकरपंत परिचारक | होय | पराभूत |
| 8. | भारत भालके | होय | विजयी |
| 9. | समाधान आवताडे | होय | पराभूत |
| 10. | सुभाष देशमुख | नाही | विजयी |
| 11. | उत्तम जानकर | होय | पराभूत |

संदर्भ: दैनिक दिव्यमराठी,सोलापूर, दि.२५ ऑक्टोबर २०१९

संजय शिंदे आणि आवताडे यांनी बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढविली. अशाप्रकारे एकमेव भाजपा उमेदवार सुभाष देशमुख वगळता ११ साखर कारखानदारांपैकी १० जणांनी पक्षांतर , पक्षांतराचा प्रयत्न किंवा बंडखोरी केली. त्यापैकी फक्त ४ जणांचा विजय झाला. अशा निवडणुकांमध्ये साखर कारखानदार आणि सभासद असलेले मतदार यांची भूमिका महत्त्वाची ची समजली जाते. एक मतपेढी म्हणून या भागातील सभासद मतदारानी अत्यंत जाणीवपूर्वक मतदान केलेले दिसून येते. ज्या साखर कारखान्याचा कारभार व्यवस्थित चालतो, ऊसाला भाव व बिले वेळेवर दिली जातात अशा साखर कारखानदार उमेदवाराला मतदारांनी निवडून दिल्याचे दिसून येते. सुभाष देशमुख यांच्या कारखान्याच्या संदर्भात लोक नाराज होते. त्यामुळे त्यांना कारखाना परिसरातील ५६ गावातून अत्यंत कमी मते मिळाली. त्यांना किमान एक लाखाचे मताधिक्य मिळेल असा अंदाज होता परतू सोलापूर शहरातील भाजपच्या मतावर केवळ ३०००० मतांनी ते विजयी झाले.

**सोलापूर जिल्ह्यातील शिवसेना :** शिवसेनेने या विधानसभा निवडणुकीत १०० जागा जिंकण्याचे मिशन हाती घेतले होते. पूर्ण राज्यात शिवसेना उमेद्वारापुढे शिवसेनेसह भाजपातील नाराज नेत्यांची बंडखोरी झाली. या बंडखोर उमेदवारांना आवरण्यासाठी एकही नेता पुढे आला नाही.त्याचा फटका शिवसेना आणि भाजपला बसला. सोलापूर जिल्ह्यातील सहा दिग्गज नेत्यांना शिवसेनेने विधानसभेची उमेदवारी दिली.. सांगोल्यातील निसटता विजय वगळून उर्वरित पाचही दिग्गज नेत्यांना पराभव पत्करावा लागला. जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. तानाजी सावंत यांनी उमेदवारी जाहीर करताना जिल्ह्यातील नेत्यांना व स्थानिक शिवसैनिकांना विचारात घेतले नाही. या ठिकाणी प्रा. सावंतचा आत्मविश्वास नडला. या मतदारसंघात उद्धव ठाकरे यांच्या सभा झाल्या मात्र बंडखोरांच्या आक्रमकतेपुढे त्यांची जादू चालली नाही सांगोल्यामध्ये भाऊसाहेब रुपनर आणि दीपक साळुंखे यांच्या मदतीमुळे शहाजी पाटलांचा ७६८ मतांनी निसटता विजय झालेला दिसून येतो. शिवसेनेने सोलापूर जिल्ह्याच्या जागावाटपामध्ये ११ पैकी ६ जागा पदरात पाडून घेतल्या. मात्र पक्षांतर्गत वर्चस्व आणि गटबाजी व्यवस्थित हाताळता न आल्यामुळे हाती येणाऱ्या जागा शिवसेनेने गमावल्या.करमाळा व शहर मध्य मतदारसंघांमध्ये शिवसेना बंडखोर अपक्ष आमदारांनी अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाची मते घेतली आहेत.

**जिल्ह्यातील समविचारी आघाडी :** जिल्ह्यातील मोहिते पाटील यांच्या राजकीय वर्चस्वाला विरोध करणे या एकमेव उद्देशाने सर्व मोहिते पाटील विरोधक एकत्र येऊन त्यांनी ही आघाडी स्थापन केली. सोलापूर जिल्हा परिषदेवर सुरुवातीला काँग्रेस आणि त्यानंतर राष्ट्रवादीची सत्ता होती. या सत्तेला अडीच वर्षापूर्वी समविचारी आघाडीच्या नेत्यांनी आव्हान दिले. अपक्ष म्हणून निवडून आलेल्या संजय शिंदे यांची अध्यक्ष पदावर वर्णी लागली. सर्व पक्षांना सोबत घेऊन शिंदे यांनी जिल्हा परिषदेचा कारभार केला. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत समविचारी आघाडीतील नेते संजय शिंदे, राजेंद्र राऊत, शहाजी पाटील हे तिघे विजयी झाले तर म्हेत्रे हे एकमेव आमदार पराभूत झाले आहेत. ते सत्ताधारी पक्षासोबत राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे येत्या काळात या आघाडीची ताकत जिल्ह्याच्या राजकारणामध्ये निश्चितपणे वाढणार आहे असे दिसते.

**निष्कर्ष :** भाजपाने आपल्या प्रचारातून ही निवडणूक देशाशी जोडण्याचा प्रयत्न केला. तसेच स्थानिक प्रश्नाकडे त्यांनी दुर्लक्ष करून काही राष्ट्रीय मुद्दे उपस्थित केले. २०१९ च्या निवडणुकीतील विजयामुळे व पक्षांतरामुळे विरोधी पक्षच शिल्लक नाही हा भाजपाचा फाजील आत्मविश्वास होता. तर विरोधी पक्ष पूर्णपणे हतबल झाला होता. शेवटी शरद पवारांनी आव्हान दिले लोकांची त्याला सहानभूती मिळाली आणि सक्षम विरोधी पक्ष नाही हा भ्रम दूर केला. शेवटच्या काळात शरद पवार यांचा जिल्हा दौरा, साताराचे भाषण यामुळे युवा मतदार राष्ट्रवादीकडे आकर्षित झाला. तर राष्ट्रवादीचा पारंपरिक मतदार पुन्हा राष्ट्रवादीकडे वळला. त्यामुळे जिल्ह्यामध्ये २०१४ च्या तुलनेने राष्ट्रवादीची केवळ १ जागा कमी झाली मात्र कॉंग्रेसला २ जागा कमी मिळाल्या.

यंदाच्या निवडणुकीमध्ये अनेक नेत्यांनी आपला पक्ष सोडून दुसऱ्या पक्षांमध्ये प्रवेश केला. यात काही नेते विजयी झाले. तर काहींना पराभव पत्करावा लागला. राज्याबरोबरच सोलापूर शहर व जिल्ह्यातही ही स्थिती पहावयास मिळते. जिल्ह्यात जवळपास अकरा नेत्यांनी पक्षांतर केले. त्यामध्ये आठ उमेदवारांना पराभव पत्करावा लागला तर तीन उमेदवार विजयी झाले.

निवडणूक कौशल्ये आत्मसात असलेली मंडळीच निवडणुका जिंकतात. राजकीय विचारांचा प्रभावापेक्षा मतदारांच्या विवेकबुद्धीवर ते वेगळाच प्रभाव टाकताना दिसतात.उमेदवारी देताना अनेक पक्ष जातीय समीकरणे जुळवण्याचा प्रयत्न करतात. परंतु मतदारांनी जातीय अभिनिवेश झुगारून दिला असल्याचे सोलापूर जिल्ह्यातील निकालावरून असे दिसून येते. सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघात असलेली लिंगायत समाजाची मोठी संख्या वगळता जिल्ह्यात कुठेही उमेद्वारची जात पाहून मतदान झालेले दिसत नाही. सोलापूर जिल्ह्यामधून एकूण ११ प्रतिनिधी निवडले त्यापैकी ४ प्रतिनिधी राजकीय वारसा असलेले आहेत तर दोन प्रतिनिधीनी नुकताच राजकारणात प्रवेश केलेला दिसून येतो. राजकीय वारसदार प्रतिनिधींची संख्या ही सुमारे ३३% इतकी दिसून येते.

थोडक्यात राष्ट्रीय पातळीवरील निवडणुकीमध्ये बालाकोट हल्यासारखे मुद्दे गाजले. त्यावेळी स्थानिक मुद्द्यांना फार महत्व नसते. सर्वशक्तिमान, बाहुबली जोखीम पत्करणारा नेता अशी मोदींची प्रतिमा उभी करून देशपातळीवर भाजपाला यश मिळवता आले.असेच सूत्र (फार्मूला) या विधानसभा निवडणुकीमध्ये वापरण्याचा प्रयत्न केला. परंतु सामुहिक हित , स्थानिक द्वंद्व, जातीय गठबंधन हे सर्व मुद्दे राष्ट्रीय आणि भावनिक मुद्द्यांवर भारी पडले. या निवडणुकीमध्ये जरी ३७०,३५अ या सारखे मुद्दे लोकांपुढे ठेवण्यात आले. तरी लोकांनी त्याचा विचार न करता केवळ उमेदवाराचा जनसंपर्क, मतदारसंघाचा विकास कार्यक्रम , स्वच्छ व पारदर्शक कारभार यावर आधारित मतदान केलेले दिसून येते.

**संदर्भ:**


1. सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१४, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
2. दैनिक दिव्य मराठी,सोलापूर
3. दैनिक सकाळ,सोलापूर
4. दैनिक लोकमत ,सोलापूर
5. https://www.adrindia.org
6. https://www.censusindia.co.in/2011
7. www.eci.gov.in/Maharashtra


**सोलापूर जिह्यातील पक्षवार प्रतिनिधी**

| अ.क्र. | मतदारसंघ | २००९ | २०१४ | २०१९ |
|---|---|---|---|---|
| 1. | करमाळा | राष्ट्रवादी | शिवसेना | अपक्ष |
| 2. | माढा | राष्ट्रवादी | राष्ट्रवादी | राष्ट्रवादी |
| 3. | बार्शी | राष्ट्रवादी | राष्ट्रवादी | अपक्ष |
| 4. | मोहोळ (अ.जा.) | राष्ट्रवादी | राष्ट्रवादी | राष्ट्रवादी |
| 5. | सोलापूर शहर उत्तर | भाजपा | भाजपा | भाजपा |
| 6. | सोलापूर शहर मध्य | कॉंग्रेस | कॉंग्रेस | कॉंग्रेस |
| 7. | अक्कलकोट | कॉंग्रेस | कॉंग्रेस | भाजपा |
| 8. | दक्षिण सोलापूर | कॉंग्रेस | भाजपा | भाजपा |
| 9. | पंढरपूर | स्वाभिमानी | कॉंग्रेस | राष्ट्रवादी |
| 10. | सांगोला | शेकाप | शेकाप | शिवसेना |
| 11. | माळशिरस (अ.जा.) | राष्ट्रवादी | राष्ट्रवादी | भाजपा |

संदर्भ: www.eci.gov.in/Maharashtra

**सोलापूर जिल्ह्यातील पक्षवार निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीची संख्या**

| अ.क्र. | राजकीय पक्ष | २००९ | २०१४ | २०१९ |
|---|---|---|---|---|
| 1. | राष्ट्रवादी | ५ | ४ | ३ |
| 2. | कॉंग्रेस | २ | ३ | १ |
| 3. | भाजपा | २ | २ | ४ |
| 4. | शिवसेना | ० | १ | १ |
| 5. | शेकाप | १ | १ | ० |
| 6. | अपक्ष | १ | ० | २ |

संदर्भ: www.eci.gov.in/Maharashtra

**सोलापूर जिल्ह्यातील जातवार आलेल्या लोकप्रतिनिधीची संख्या**

| अ.क्र. | जात | २००९ | २०१४ | २०१९ |
|---|---|---|---|---|
| 1. | मराठा | ४ | ४ | ६ |
| 2. | लिंगायत | ३ | ३ | २ |
| 3. | धनगर | १ | १ | ० |
| 4. | चर्मकार | १ | १ | १ |
| 5. | ढोर | १ | १ | १ |
| 6. | मातंग | १ | १ | ० |
| 7. | कैकाडी | ० | ० | १ |

संदर्भ: www.eci.gov.in/Maharashtra